| **Headline:** SEBI approves appointment of Ashok Chawla as NSE chairman | |
|---|---|
| **Source:** Sakal, Mumbai | **Date:** 15 May 2016 |

# एनएसईच्या अध्यक्षपदासाठी अशोक चावला यांच्या नावाला मंजुरी



अशोक चावला

**मुंबई :** राष्ट्रीय शेअर बाजाराच्या (एनएसई) अध्यक्षपदी अशोक चावला यांच्या निवडीला सिक्युरिटी एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडियाने (सेबी) मंजुरी दिली आहे. चावला हे माजी केंद्रीय अर्थ सचिव असून, भारतीय स्पर्धात्मक आयोगाचे माजी अध्यक्ष आहेत. एनएसईचे आधीचे अध्यक्ष एस. बी. माथूर यांचा कार्यकाळ संपल्याने ते या वर्षाच्या सुरुवातीला पायउतार झाले आहेत. त्यांच्या जागी चावला यांच्या नावाचा प्रस्ताव एनएसइने दिला होता. त्यांच्या नावाला सेबीची मंजुरी मिळण्याची एनएसईला प्रतीक्षा होती. अखेर त्यांच्या नावाला सेबीने मंजुरी दिली आहे.